## ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

### ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.२८/०३/२०२५

## जिल्हा : सोलापूर

### हवामान अंदाज :

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२८/०३/२०२५ ते ०१/०४/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 29 | 30 | 31 | 1 | 2 |
| पाऊस (ममी) | 2 | 3 | 5 | 3 | 2 |
| कमाल तापमान (अं.से.) | 40 | 41 | 40 | 39 | 39 |
| कमान तापमान (अं.से.) | 23 | 24 | 25 | 26 | 25 |
| ढग स्थिती (आकाश) | 2 | 2 | 4 | 3 | 4 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 64 | 64 | 65 | 65 | 66 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 36 | 35 | 36 | 35 | 36 |
| वाऱ्याचा वेग (कमी/तास) | 14 | 9 | 2 | 3 | 1 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 346 | 18 | 79 | 229 | 0 |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृ ष वषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २८ मार्च, २०२५ ते ०१ ए प्रल, २०२५ दरम्यान तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. |
| वस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | वस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र वभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, ना शक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ०२ ते ०८ ए प्रल, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतमालाची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी तसेच उघड्यावरील धान्य ताडपत्रीने झाकून ठेवावे.<br>• उन्हाळी पके, भाजीपाला व फळबागांना स्थानिक परिस्थिती, ज मनीची खोली/ ज मनीचा प्रकार व गरजेनुसार पाणी द्यावे.<br>• फळबागेमध्ये ज मनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनांचा वापर करावा.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पकाचे कीड व रोगासंदर्भात निय मत सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आ र्थक नुकसान पातळीच्या वर असल्यास व वध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी मेघगर्जना व वजेचा पूर्वानुमाना करीता दा मनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी कृ ष वषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृ ष वद्यापीठाच्या कृ षद र्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |

| | | |
|---|---|---|
| हरभरा | साठवणूक अवस्था | काढलेल्या धान्यास ५-६ दिवस कडक ऊन द्यावे. हरभरा कोठीमध्ये साठवून ठेवावा. त्यामध्ये कडु लंबाचा पाला घालावा. त्यामुळे साठवणीत कीड लागत नाही. |
| उन्हाळी भुईमूग | पक वाढीची अवस्था | उन्हाळी भुईमूग पकास ज मनीच्या मगदूराप्रमाणे व उपलब्धतेनुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पकाची कोळपणी व खुरपणी करुन पक तण वरहीत ठेवावे जेणेकरून तणांची अनद्रव्यांसाठीची स्पर्धा रोखण्यास मदत होईल. भुईमूगाच्या आऱ्या ज मनीत (३५ ते ४५ दिवस) जाण्यास सुरुवात झाल्यावर आंतरमशागत करू नये. आऱ्या ज मनीत जाण्याच्या वेळी तसेच शेंगा पोसण्याच्या कालावधीत पाण्याचा ताण पडू देवू नये. |
| उन्हाळी बाजरी | पक वाढीची अवस्था | उन्हाळी बाजरी पकास ज मनीच्या मगदुरानुसार व पकाच्या वाढीच्या संवेदनक्षम अवस्थेत १० ते १२ दिवसांच्या अंतराने ५ ते ६ पाण्याच्या पाळ्या द्याव्यात . पाण्याची उपलब्धता मर्यादित असल्यास, पहिले पाणी फुटवे येण्याच्या वेळी (पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी ), दुसरे पाणी पीक पोटरीत असताना (पेरणीनंतर ३५ ते ४५ दिवसांनी ), तिसरे पाणी दाणे भरतेवेळी (पेरणीनंतर ६० ते ६५ दिवसांनी) द्यावे. |
| ऊस | पक वाढीची अवस्था | ऊस पकातील खोड कडीच्या जै वक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चलोनिस (ट्रायकोकार्ड) प्रती एकर चार तसेच कामगंध सापळे (इ.एस.बी.ल्यूर) ५ प्रती हेक्टरी वापरावेत. प्रादुर्भावग्रस्त झालेली रोपे ज मनीलगत कापावीत आ ण नष्ट करावीत. |
| रब्बी ज्वारी | साठवणूक अवस्था | मळणी झालेले धान्य उन्हात चांगले वाळवावे (धान्यातील ओलावा १० % पेक्षा कमी असावा) आ ण त्यामध्ये वाळलेला कडूनिंबाचा पाला मसळून साठवणूक करावी. साठवण कोंदट कवा ओलसर जागेत करू नये. |
| गहू | साठवणूक अवस्था | मळणी झालेले गहू पीक, उन्हात चांगले वाळवावे आ ण साठवण कोंदट कवा ओलसर जागेत करू नये. |
| मका | काढणी ते साठवणूक अवस्था | अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% कंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रम प्रति लटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. पीक काढणी अवस्थेत आलेले असल्यास त्याची काढणी करावी. तसेच उन्हात चांगले वाळवावेत. साठवण कोंदट कवा ओलसर जागेत करू नये. |
| आंबा | फळधारण अवस्था | आंबा मोहरामधील पर्णगुच्छ दिसून आल्यास तो मोहोर कापून नष्ट करावे व तोडलेल्या जागी कॉपरऑक्झीक्लोराईड द्रावण ३ ग्रॅम प्रति लटर पाण्यासोबत लावावे. तसेच आंबा पकाच्या नवीन पालवीवरील पर्णगुच्छ दिसून आल्यास ती पालवी कापून नष्ट करावी व तोडलेल्या जागी कॉपरऑक्झीक्लोराईड द्रावण ३ ग्रॅम प्रति लटर पाण्यासोबत लावावे. अ धक तापमानामुळे झाडाला पाण्याचा ताण बसून फळगळ होण्याची शक्यता असल्याने पाण्याच्या उपलब्धतेनुसार बागेस पाणी द्यावे. बागेमध्ये गारवा टिकवून ठेवण्यासाठी उपाययोजना करावी. बागेमध्ये ज मनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनांचा वापर करावा. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | महात्मा फुले कृषी वद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्र शक्षण केंद्रांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र वभागाच्यावतीने वक सत करण्यात आलेल्या देशातल्या पहिल्या फुले अमृतकाळ ( **Phule Amrutkal App)** या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (ॲप) लोकार्पण झाले असून , आता आपण ते मोबाईल मध्ये इंस्टाल करून मोबाईलवर पशुसल्ला घेऊ शकतो.<br>फुले अमृतकाळ ॲप डाउनलोड (**Phule Amrutkal App Download)** केल्याने होणारे फायदे : फुले अमृतकाळ या ॲप च्याद्वारे जनावरांना उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी , गोठ्यातील तापमान घट वण्याकरिता व योग्य आर्द्रता राखण्याकरिता सावलीची सोय करणे , योग्य वायु वजन राखणे , पण्याकरिता थंड पाणी उपलब्ध करून देणे , फॅन कंवा फॉगर यंत्रणा स्वयंचलीत पद्धतीने सुरू करणे तसेच संतु लत आहार नियोजन इत्यादी उपाय योजना करण्यासाठी |

| | | |
|---|---|---|
| | | वेळोवेळी सूचना दिल्या जातील. |

*टिप : शेतकरीबंधूनी पकावर कटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता कसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.

**स्रोत :**
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :-
ठिकाण : कृ .म.वि., पुणे.
दि. : २८.०३.२०२५

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**